THE SILENT MESSAGE

connect. create. convey

# नवी दिशा

## 'Nayee Disha'

A Philosophy, A Mindset

## रूपांतर च्या लेखकाकडून सूचना:

"अरविंद नाडकर्णी, ह्या एका सृजनशिल अवलिया अभियंत्याच्या, एका हिंदी पद्याचे केलेले स्वैर रूपांतर."

नवी दिशा अन् नव्याच वाटा
जुनापुराणा नकोच ताटा

गणगोतांची जुनीच गाणी,
तू-तू, मी-मी, अंत विराणी.
घाव देउनी, घाव झेलुनी,
उरते रिक्त कहाणी.
प्राक्तनाचा प्रालब्धित घाटा,
नवी दिशा अन् नव्याच वाटा.

नव्या दिशेचे वळण निराळे,
वळण्याचे परिबन्ध निराळे.
नव्या युक्ती, अन् नव्याच शक्ती,
नवे सोबती, नवीच माती.
नव्या दिशेची जडली नाती...

नव्या दिशेचे मर्म उघडे,
मतभेदांचे कुणा ना वावडे.
नवीन संकेत, नव्या रुढी.
नव्या अशा अन् अभिलाषा,
प्रेम त्याची परिभाषा...अशी ही दिशा.

श्रवणाचा हा ढंग आगळा,
संवादाचा सूर निराळा.
नको नेभळी, कृश नेमस्ती,
स्वतशक्तीची अमित मस्ती.

नजर तीच, दृष्टी नवी
सौन्दर्य तेच, सृष्टी नवी.
सौमिल तेच, सहकार्य नवे,
साहचार्याचे सामर्ध्य नवे!

कसर विसरूनी, कुसर पहा,
बिंबाचे प्रतिबिंब न्याहा.
भाव तेच, भावार्थ नवे,
शब्द तेच, उच्चार नवे!

नव्या दिशेनी का जावे आम्ही?
परंपरांना का त्यागावे आम्ही?
हा नवा सूर, हा नवा ताल,
हा नवा राग, हि नवी रागिणी...
जुन्या पिढींची जुनीच गुंफण,
हवे कशाला नावेच मंथन?

जनहो नीट पहा,
निरखून राहा,
परिवर्तित परिसर सारा हा.
रीती भाटी ह्या नव्या नव्या,
बदलून गेली सारी दुनिया.
नवीन साज अन् नवीन लेणी,
नको कथा ती जुनी-पुराणी.

नव्या दिशेचा भयगंड नको तो,
किंतु-परंतु, जंतु नको तो.
महापुरातून झाडे जाती,
लवणारी लव्हाळी राहती.

बदलाचा संकेत जुना हा,
स्थैर्याचा उन्मेष नवा हा!

अर्थ तोच, भावार्थ नवा,
गाण्याचा अंदाज नवा.
तोच सूर अन् तोच ताल,
तोच राग, पण नवा खयाल.

नवी दिशा अन् नव्याच वाटा,
जूनापुराणा नकोच तटा.

बदलायचं आहे पण इथे नाही वेळ
नव्या जुन्याचा बसेल कसा मेळ
घड्याळाच्या काट्यावर चालणारी स्पंदने
परिवर्तनाच्या पहाटेला वर्तमानाची बंधने
फुरसत मिळेल जेंव्हा कामात
पाहू पुढे मागे, बदलू तेंव्हा आरामात!

कालप्रवाही मुक्त कोण तो?
मोक्षाचा अधिकारी कोण तो?
आज असें, तर उद्या नसेन,
तीरातून पैलतीरी बसेन.
नैवेद्याच्या घासासारखे वाटलेले हे निवारे,
उद्याच्या झुंझुरतीचे द्यावे कुणी हे धुमारे.

क्षण आजचा निर्णयाचा,
पाऊस वादळी तुफानाचा.
दडून बसाल जर आलयात,
वाहून जाल प्रलयात.

उफ़ाळत्या प्रमाती झोकुनी स्वयं जो देही,
अस्तित्व त्याचे राही निर्माल्य बाकी सारे.
जुन्या पुराण्या रुढी अन् गाठी,
तेच प्राप्य अन् तशाच साठी!

घाण्यावरचे झोपडी बैल,
तेच बी अन् तेच तैल.
झुगारून बंधने अन् तोडूनी त्या शृंखला,
वर्तमानाच्या प्रयत्ना घ्या उद्याची मेखला.

नव्या वाटेने चालत राहू,
नव्या पहाटी सुखस्वप्ने पाहू.
नवा श्वास अन् नवविश्वास,
नवा ध्यास अन् नवा प्रयास.
वाळवंटात उमलून येऊ;
अग्निदिव्ययी अन् तेजून राहू!!

Inspired Adaptation by Dr. Sanjay Oak

Original Hindi Poem
written by Arvind in 1996 at Rajasthan, India



ARVIND NADKARNI

Founder